विमा संचालनालयाच्या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील २५% पदे निरसित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक-आस्थाप-२०१७/प्र.क्र.९६/विमा प्रशासन.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि. ३१ जानेवारी, २०१८.

संदर्भ:- १. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विमासं-१००७/प्र.क्र.५५/शा.हमी. दि.३१ जानेवारी, २००८.
२.वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५ / प्र.क्र.२०१५/ प्र.क्र.५७/ २०१७/ विसु-१ दि.१४ जानेवारी, २०१६.

शासन निर्णय:-

वित्त विभाग, शासन निर्णय दि. १४ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयातील परि.१ (५) नुसार गट-ड संवर्गात मंजूर पदांपैकी २५% पदे निरसित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

२. विमा संचालनालयाच्या आस्थापनेवर दि.३१ जानेवारी, २००८ च्या आकृत्तीबंधानुसार गट-ड संवर्गात एकुण १७ पदे मंजूर आहेत. त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे झेरॉक्स यंत्र चालक-१, दप्तरी-३, नाईक-१, शिपाई/चपराशी-१२ एकुण-१७ असे आहे. सदर १७ पदांपैकी २५ % पदे निरसित करणे आवश्यक असल्याने गट-ड संवर्गातील दप्तरी-१ व शिपाई/चपराशी-३ अशी रिक्त असलेली २५% प्रमाणे एकूण ४ पदे निरसित करण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१८०२०२१३०६१०५४०५ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Shubhangi Rajan Sheth

Digitally signed by Shubhangi Rajan Sheth
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed6787d4f25b2cc00214a10047a10d4fa848c8d19fb8dda27b4525e3ace2c767, cn=Shubhangi Rajan Sheth
Date: 2018.02.02 13:14:01 +05'30'

(शुभांगी शेठ)
सह सचिव, वित्त विभाग.

प्रत,

१. प्रधान सचिव (आकृत्तीबंध पुनर्रचनाकक्ष) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. प्रधान सचिव (ले.व को.) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. सह सचिव, वित्त विभाग,/(विमा प्रशासन) मुंबई-३२
४. उप सचिव, वित्त विभाग/(आकृत्तीबंध पुनर्रचनाकक्ष) मुंबई-३२.
५. संचालक, विमा संचालनालय, मुंबई-५१
६. कक्ष अधिकारी, आकृत्तीबंध पुनर्रचनाकक्ष वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. निवडनस्ती, वित्त विभाग/ विमा प्रशासन मुंबई-३२